# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० <br> फॅक्स - ०२२ - २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र.राआसो/CHO/एकवेळ बदली/ ३०९७७-३१०५७ /२५

दिनांक-२१/०६/२०२५

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद.........( सर्व )

**विषय -समुदाय आरोग्य अधिकारी यांचे बदली करीताच्या समुपदेशनासाठी नियमावली..**

**संदर्भ**:- १. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण- १०२४/प्र.क्र ५५६/( ई-११२१३५३) एनएचएम,दिनांक २७.०५.२०२५. रोजीचा शासन निर्णय.

२. अवर सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे क्र.संकीर्ण-१०२४/ प्र.क्र.५५६/एनएचएम दिनांक २८.०५.२०२५ रोजीचे पत्र.

३. या कार्यालयाचे जा.क्र.राआसो/CHO/एकवेळ बदली/१९४४७-५२७/२५ दिनांक २९.०५.२०२५ रोजीचे पत्र.

४. या कार्यालयाचे जा.क्र.राआसो/CHO/एकवेळ बदली/मार्गदर्शक सुचना/२७६७१-२७७५१/२५ दिनांक १४.०६.२०२५ रोजीचे पत्र.

५. मा. आयुक्त आरोग्य सेवा व संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांची मंजुर नस्ती.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित करण्यात येते की, एकवेळ समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या आंतरजिल्हा बदल्या दिनांक २३ ते २९ जुन २०२५ या कालावधीत करावयाच्या आहेत, त्याअनुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतर जिल्हा बदली समुपदेशनासाठी खालीलप्रमाणे नियमावली प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सेवा ज्येष्ठता यादीनुसार समुदाय आरोग्य अधिकारी यांना बोलावले जाईल.

२. पहिल्या दिवशी आदिवासी भागात इच्छुक असलेल्या सर्व समुदाय आरोग्य अधिका-यांना बोलावले जाईल आणि आदिवासी भागातील निव्वळ रिक्त तसेच संभाव्य रिक्त पदांची यादी दाखवली जाईल.

३. आदिवासी भागात जाण्यास इच्छुक सर्व उमेदवारांनी आदिवासी रिक्त पदांसाठी पहिल्या दिवशीच्या समुपदेशनात उपस्थित रहावे.

४. उपस्थित उमेदवारांना पदाच्या निवडीसाठी समुपदेशना करीता ज्येष्ठतेनुसार बोलविण्यात येईल.

५. सर्वांनी सकाळी ९ वाजता जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या समुपदेशनाच्या ठिकाणी हजर रहाणे आवश्यक आहे.

६. ठरवुन दिलेल्या ठिकाणी ऑनलाइन आणि ऑफलाइन पध्दतीने ज्येष्ठता यादी, रिक्त पदांची यादी व उपलब्ध बिंदु प्रदर्शित केले जातील. उमेदवार ते सकाळी पाहू शकतील. सकाळी ९.०० नंतर उमेदवारांनी समुपदेशनाच्या ठिकाणी हजर असणे आवश्यक आहे. सकाळी १०.०० वाजेपर्यंत उपस्थितांची नोंद घेतली जाईल आणि सदर उपस्थितांची यादी सकाळी १०.१५ पर्यंत राज्यस्तरीय कार्यालयास पाठवली जाईल. समुपदेशन सकाळी ११.०० पर्यत सुरू होईल आणी सर्व उपस्थित उमेदवारांना संधी मिळेपर्यत चालु राहील.

७. समुपदेशन सुरू झाल्यानंतर दिलेल्या वेळेतच समुपदेशनाच्या ठिकाणी हजर असणा-या उमेदवारानांच संधी मिळेल, विलंबाने आलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांचा जेष्ठता अनुक्रमांक झालेला असल्यास सेवा जेष्ठतेनुसार संधी मिळणार नाही. उमेदवाराच्या उपस्थिती नंतर त्यांना संधी देण्यात येईल.

८. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची यादी स्वतंत्रपणे प्रकाशित केली जाईल.

९. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांमध्ये स्पष्ट रिक्त पदे तसेच संभाव्य रिक्त पदे दर्शवावीत.

१०. सर्व उमेदवारांना त्यांचा ज्येष्ठता क्रमांक माहित असावा,जेष्ठता क्रमांक माहीत नसल्यास संबंधितांशी संवाद साधण्यात अडचणी उदभवू शकतात. जेष्ठतेबाबत योग्य माहीतीसाठी संबंधित जिल्हयांचे जिल्हा आरोग्य अधिकारी जबाबदार असतील .

११. नियमित समुपदेशन वेळी इच्छुक उमेदवारांची उपस्थितीची यादी जिल्हा आरोग्य अधिकारी हे उमेदवारांच्या जेष्ठता क्रमांकासह राज्याला सकाळी १०.१५ पर्यंत ऑनलाइन शेअर करतील आणि समुपदेशन सकाळी ११.०० पर्यत सुरू होईल.

१२. सर्व उमेदवार आणि जिल्हयाचे अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी, CPHC समन्वयक हे समुपदेशन सत्रासाठी उपस्थित राहतील.

१३. जर उपलब्ध पद स्पष्टपणे रिक्त असेल तर उमेदवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संमतीपत्र घेतल्यानंतर समुपदेशनाच्या दिवशीच आदेश निर्गमित केले जातील.

१४. आदिवासी भागातील समुपदेशनाच्या वेळी जर उमेदवाराने समुपदेशनामध्ये संभाव्य रिक्त पदी बदली मागितल्यास तर त्या उमेदवाराला त्या पदाचे तात्पूरते वाटप केले जाईल. संभाव्य रिक्त पदावरील उमेदवाराला आदिवासी क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील पदाचा पर्याय मिळाल्यानंतर संभाव्य रिक्त पदावरील बदली निश्चित केली जाईल.

१५. ज्या उमेदवारांनी आदिवासी संभाव्य रिक्त पदासाठी निवड केली आहे आणि जर संभाव्य समुदाय आरोग्य अधिका-याला विनंती नुसार पद मिळाले नाही तर संभाव्य पदावर मागणी केलेल्या समुदाय आरोग्य अधिका-याची बदली रद्द केली जाईल तथापि सदर समुदाय अधिकारी त्यावेळी उपलब्ध असलेल्या रिक्त पदाचा पर्याय निवड करू शकतो. तसेच तो जेष्ठतेनुसार नियमित समुपदेशनात देखील सहभागी होऊ शकतो आणि तो इतर निव्वळ रिक्त पद निवडू शकतो. मात्र अशावेळी त्यांनी निवडलेला संभाव्य रिक्त पदावरील दावा रद्द केला जाईल.

१६. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांसाठी समुपदेशन प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून बिगर आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदे प्रदर्शित केली जातील.

१७. नियमित समुपदेशनासाठी निव्वळ रिक्त पदे दर्शविली जातील. कारण संभाव्य रिक्त पदे रिक्त होतीलच याची कोणतीही हमी नाही.

१८. कोणत्याही समुदाय आरोग्य अधिकारी यांना विनंतीने पद मिळाल्यावरच त्याचे/तिचे पद रिक्त असल्याचे दाखवले जाईल. पुढील उमेदवारांसाठी हे पद रिक्त पद म्हणुन उपलब्ध असेल. सुरवातीच्या ( ज्यांचे समुपदेशन झाले आहे अशा) उमेदवारांना त्या पदाचा पर्याय मिळणार नाही कारण त्यांचे समुपदेशन आधीच झालेले असेल.

१९. एकदा समुदाय आरोग्य अधिका-याला विनंतीने पद देण्यात आले की, त्याचे पद पुढील उमेदवारांसाठी ताबडतोब खुले होईल आणि म्हणून एकदा पदस्थापना दिली की पुर्वीचे पद पुन्हा सदर उमेदवारास देता येणार नाही.

२०. जर अपवादात्मक परिस्थितीत उमेदवाराने पदाची विनंती केली तर संपूर्ण समुपदेशन प्रक्रीया झाल्यानंतर आणि त्यावेळी उपलब्ध असलेल्या रिक्त पदांनुसारच त्याचा विचार केला जाईल आणि हे उमेदवारावर बंधनकारक असेल.

२१. नियमित समुपदेशनाच्या शेवटच्या दिवशी आदिवासी क्षेत्रामध्ये इच्छा असल्यास प्रवर्गाच्या बिंदूनुसार पात्र उमेदवारास आपआपसांत बदली बाबत विचार करण्यात येईल. यासाठी समुपदेशनाच्या पहिल्या दिवशी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे समुदाय आरोग्य अधिकारी यांना अर्ज सादर करता येतील आणि संबंधित दोन्ही जिल्हा आरोग्य अधिकारी सदर अर्ज ऑनलाइन राज्यस्तरीय कार्यालयास पाठवतील. पडताळणी झालेनंतर उपलब्ध बिंदू नुसार बदली आदेश निर्गमित केले जातील.

२२. शेवटच्या दिवशी स्ट्रे राउंड असेल, जिथे नियमित समुपदेशनाच्या शेवटी रिक्त पदांवर आधारित बदली पात्र इच्छुक उमेदवारांना त्यांच्या उपलब्ध बिंदूनुसार संधी दिली जाईल.

२३. स्ट्रे राउंडमध्ये ज्या उमेदवारांची पुर्वीच्या समुपदेशन राऊंडमध्ये आदिवासी संभाव्य रिक्त पदासाठी बदली केली जात आहे आणि त्यांचा आदेश त्या आदिवासी भागातील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या पदावर निर्गमीत केला त्यांना पुन्हा समुपदेशनात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२४. आंतर जिल्हा बदलीसाठी शासनपत्र दिनांक २८.०५.२०२५ रोजीच्या शासनपत्रानुसार बिंदुनामावली लागु राहील.

२५. आयुष्मान आरोग्य मंदीर कक्षामार्फत निश्चीत असलेले आयुष्मान आरोग्य मंदीर केंद्रच बदलीसाठी पात्र धरण्यात येईल.

२६. दिनांक १० डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार भरलेल्या पदाच्या ७०% पदे जिल्हयात कार्यरत राहतील व मंजुर पदापैकी ३०% पेक्षा जास्त पदे रिक्त राहणार नाहीत याची दक्षता आपल्या स्तरावरुन घ्यावी.

२७. सदयस्थितीत मंजुर महानगरपालीका कार्यक्षेत्र / प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेली आयुष्मान आरोग्य मंदीरांच्या ठिकाणी विनंती बदली मागीतल्यास इच्छुक उमेदवारांना सदरील आयुष्मान आरोग्य मंदीर भविष्यात ज्या ठिकाणी स्थलांतरीत होईल त्या ठिकाणी कामकाज करावे लागेल याची पुर्वकल्पना दयावी.

२८. शासननिर्णय दिनांक ९ एप्रिल २०१८ अन्वये पती-पत्नी एकत्रीकरण व दुर्धर आजाराचे वर्गीकरणानुसार प्राधान्यक्रम निश्चीत करण्यात आला आहे याची जाणीव समुपदेशना दरम्यान उमेदवारांना करुन दयावी

२९. जिल्हास्तरावर समुपदेशन ज्या ठिकाणी आयोजीत करावयाचे आहे ते ठिकाण सर्व उमेदवारास अवगत करुन दयावे. तसेच समुपदेशन सत्राच्या वेळी निश्चित ठिकाणी VC Link व्दारे व कार्यालयीन पदनामासह

उपस्थित राहावे. ( वैयक्तीक मोबाईल व्दारे /इतरत्र ठिकाणाहुन समुपदेशन VC सत्रास उपस्थित राहु दिले जाणार नाही.)

३०. राज्यस्तरावरुन निर्गमीत केलेल्या जिल्हानिहाय जेष्ठता यादीनुसारच दैनंदीन हजेरीपत्रक chotransfer2025@gmail.com या मेल वर दररोज सकाळी १०.१५ वाजेपर्यंत राज्यस्तरावर पाठविण्यात यावे.

डॉ. नितीन अंबाडेकर
संचालक आरोग्य सेवा
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई.

**प्रत माहीतस्तव सादर -**

- मा. सचिव -१ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई
- मा. सचिव -२ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई
- मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
- सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
- मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.......... ( सर्व )
- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ............... ( सर्व )